# महाराष्ट्रातील उद्योजकता विकास कार्यक्रम व महिला उद्योजक

**श्री. मदन जी. प्रधान,** अर्थशास्त्र विभाग प्रमुख, ऑर्टस् कॉलेज, सिहोरा pradhan.madan277@gmail.com

**सारांश :**औद्योगिक क्षेत्रात महाराष्ट्र राज्य आघाडीवर असल्याचे सांगितले जाते यामध्ये उद्योजकता विकास कार्यक्रमाची भूमिका महत्वाची आहे. या विकास कार्यक्रमाच्या माध्यमातून आर्थिक विकासाचा दर वाढविणे, आर्थिक क्रियांचा विस्तार करणे, मागास क्षेत्राचा औद्योगिक विकास करणे, रोजगार वाढविणे, विकासाच्या प्रक्रियेत समाजाच्या सर्व वर्गांना सहभागी करणे इ. संधी या कार्यक्रमाच्या माध्यमातून निर्माण होत आहे. मुख्यतः या माध्यमातून महिला उद्योग क्षेत्रात येऊन आर्थिक विकासाला गती देत आहे. तरीपण पुरूष उद्योजकांच्या तुलनेत महिला उद्योजकांचे प्रमाण कमी आहे. औद्योगिकदृष्टया पुढारलेल्या महाराष्ट्रात उद्योजकता विकास कार्यक्रमांचा परिणाम महिला उद्योजक वाढविण्यावर फारसा झालेला दिसून येत नाही.

**प्रस्तावना :**उद्योजकता विकास आज प्रत्येक राष्ट्राची गरज बनली आहे. विकसनशील देशांमध्ये उद्योजकतेचा विकास एक नवीन संकल्पना असली तरी नियोजित प्रयत्नांद्वारे अनेक महिलांना त्यांच्या योग्यतेच्या आधारावर उद्योग या क्षेत्रात आणले जाऊ शकते. विकसनशील देशांमध्ये अनेक समस्या असतात जसे - बेरोजगारी, असंतूलीत क्षेत्रीय विकास, आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण, कमी उत्पादकता दारिद्रय अशा अनेक समस्यांचे निवारण उद्योजकतेच्या विकासाद्वारा केले जाऊ शकते. म्हणूनच वर्तमानकाळात प्रत्येक देशातील सरकार उद्योजकांच्या विकासावर लक्ष केंद्रीत करीत आहे. उद्योजकतेच्या निकोप वाढीकरीता सुविधा निर्माण करून अनेक संस्था व संघटना स्थापन करित आहे.

उद्योजकीय योग्यता प्रत्येक देश व समाजामध्ये विद्यमान असते. आज आवश्यकता आहे ती उद्योजकीय क्षमता असणा-या व्यक्तींची ओळख करून त्यांच्या क्षमतांना विकसीत करणे, पूर्ण करणे, क्रियान्वित करणे. परंतू ब-याचदा प्रतिकूल सामाजिक-आर्थिक वातावरण उद्योजकतेच्या विकासाला बाधक ठरत असतो. भारतासंदर्भात मान्य केले जाते की, देशात ब-याच उद्योजकीय संभाव्यता विद्यमान आहेत. हया संभाव्यतांना योग्य प्रकारे विकसीत केल्या गेले तर निश्चितपणे देशाची आर्थिक-सामाजिक प्रगती, क्षेत्रीय प्रगती तसेच स्थानिक संसाधनांची प्रगती केल्या जाऊ शकते.आज पुरूष उद्योजकांनी उद्योग क्षेत्र बरेच व्यापून टाकले असले तरी महिला पुरूषांच्या तूलनेत खूप कमी प्रमाणात उद्योग क्षेत्रात येत आहेत. उद्योग क्षेत्रातील महिलांचे प्रमाण वाढविण्याच्या अनेक साधनांपैकी एक साधन म्हणजे उद्योजकता विकास कार्यक्रम होय.

**उद्योजकता विकास कार्यक्रम - संकल्पना :**

**प्रो. उदय पारीक व मनोहर नाडकर्णी :**'व्यावहारिक दृष्टीकोणातून उद्योजकता विकास म्हणजे, उद्योजकांचा विकास आणि साहस वाढविण्याकरिता प्रोत्साहित करणे होय.''

**प्रो. एन. पी. सिंह :**''उद्योजकता विकास कार्यक्रम अशी प्रक्रिया आहे ज्यामध्ये खालील क्रियांचा समावेश होतो - (१) सम्भावित उद्योजकांमध्ये उद्योजकतेची प्रेरणा जागृत करणे, उद्योजकीय गुणांचा तसेच कौशल्याचा विकास करणे, (२) दैनंदिन क्रियांमध्ये उद्योजकीय व्यवहार उत्पन्न करणे तसेच त्यामध्ये सूधार करणे, (३) उद्योजकीय कार्याद्वारा त्यांना आपला उद्योग स्थापन/ विकसीत करण्याकरीता सहकार्य करणे.''

**उद्योजकता विकास कार्यक्रमांची आवष्यकता :**संपूर्ण देशामध्ये महाराष्ट्र राज्य सामाजिक-आर्थिक, औद्योगिकदृष्टया पुढारलेले राज्य आहे. भारतामध्ये महाराष्ट्र राज्यातील उद्योगांचा विकास ब-याचपैकी झाला आहे. महाराष्ट्र राज्यात उद्योजकता विकास कार्यक्रमाच्या माध्यमातून राज्याचा विकासाचा दर वाढविणे, मागास क्षेत्राचा विकास करणे, आर्थिक उत्पन्न कमी असणा-या घटकांचा उत्पन्न स्तर उंचावणे, रोजगार वाढविणे इ. कार्ये केले जात आहेत. महाराष्ट्र राज्याच्या संतुलित विकासाकरीता उद्योजकता विकास कार्यक्रमांची भूमिका अत्यंत महत्वपूर्ण बनली आहे. त्याचप्रमाणे या कार्यक्रमाला ग्रामीण विकासाकरीता आवश्यक मानले आहे. या माध्यमातून ग्रामीण महिला उद्योग क्षेत्रात येऊन आर्थिक विकासाला गती देत आहेत. मागासलेल्या विभागात उद्योजकता विकास कार्यक्रमांच्या माध्यमातून विकासाला गती देऊन संतूलित विकास साधता येते.

**महाराष्ट्रातील उद्योजकता विकास :**महाराष्ट्र हा एक धाडसी व उद्यमशिल प्रांत होय. या प्रांतातील लोक हे दमदार, उत्साही व कष्टाळू आहेत. मराठी माणसांची ही वैशिष्टये इतिहासातही दिसून येतात. शिवाजी महाराजांच्या नेतृत्वाखाली हिंदवी स्वराज्य स्थापना झाले त्यामागेही मराठी उद्योजकतेची प्रेरणा सतत जिवंत होती. महाराष्ट्राचे वर्णन 'औद्योगिकादृष्टया भारताचे रोम' असे केले जाते. संपूर्ण भारतामध्ये महाराष्ट्र राज्य आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतीक उपक्रमांमध्ये आघाडीवर आहे. त्यानुसार मराठी उद्योजकता कशी प्रगल्भपणे विकसीत झाली याचा विचार करणे उचित ठरेल.

उद्योग संचालनालय हे महाराष्ट्र शासनाच्या उद्योग विभागाचे कार्यकारी अंग आहे. उद्योग संचालनालयाची स्थापना महाराष्ट्रातील उद्योगांसाठी प्रोत्साहन, निरीक्षण आणि विविध योजना विकसीत करण्यासाठी स्थापन करण्यात आले आहे. राज्यामध्ये उद्योगांना प्रोत्साहीत करण्यासाठी तसेच त्यांच्या सर्वांगिण विकासासाठी तयार करण्यात आलेली विविध शासकीय धोरणे तसेच योजनांची अंमलबजावणी उद्योग संचालनालया मार्फत उद्योगांशी संबंधीत राज्यस्तरीय महामंडळ जसे की, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र लघू उद्योग विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य खादी आणि ग्रामोद्योग मंडळ इ. यांचे समन्वयाने करण्यात येते. सहा प्रादेशिक कार्यालये व एक उप प्रादेशिक कार्यालय (नांदेड) तसेच प्रत्येक जिल्हयामधील जिल्हा उद्योग केंद्र याद्वारे उद्योग संचालनालय समर्थित आहे. विविध शासकीय धोरणे तसेच योजनांची प्रभावी अंमलबजावणी जिल्हा पातळीवरच होण्याकरीता अधिकारांचे विकेंद्रीकरण करण्यात आले असून अधिकांश अधिकार जिल्हा उद्योग केंद्रांना देण्यात आले आहेत.

औद्योगिक क्षेत्रात महाराष्ट्र आघाडीवर असल्याचे सांगितले जाते. महाराष्ट्रात लघुउद्योग वाढीसाठी सहकारी औद्योगिक वसाहतींची योजना १९५९-१९६० पासुन राबविण्यास सुरूवात झाली. मुळ केंद्रशासनाची ही योजना राज्य सरकारकडे हस्तांतरित झाल्यानंतर महाराष्ट्रात सहकारी औद्योगिक वसाहती वेगाने वाढल्या. त्यामुळे उद्योजकता वाढीस लागून हजारो उद्योग उभे राहीले. महाराष्ट्रात नवीन उद्योग सूरू करण्यासाठी १९६० नंतर प्रशंसनीय प्रयत्न केले गेले. परिणामतः आर्थिक, औद्योगिक क्षेत्रात महाराष्ट्राने संपूर्ण देशात अग्रगण्य स्थान मिळविले आहे. देशात असलेल्या मोठया, मध्यम आणि लघू उद्योग, कुटीरोद्योग यांच्यापैकी १/५ उद्योग एकटया महाराष्ट्रात आहेत. याकरिता राज्याने निरनिराळी महामंडळे स्थापन केलेली आहेत. त्यामुळे औद्योगिक विकासाला गती मिळाली आहे. विशेषतः महाराष्ट्र राज्य वित महामंडळ, महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य लघू उद्योग विकास महामंडळ या संस्थांचे कार्य अत्यंत पोषक ठरले आहे.

महाराष्ट्र राज्याने १९९३ मध्ये पहिले औद्योगिक धोरण जाहीर केले. त्यानंतर १९९५, २००१ व २००६ मध्ये औद्योगिक धोरण जाहीर करण्यात आले. अलीकडे २२ फेब्रुवारी २०१३ ला नवीन औद्योगिक धोरण जाहिर करण्यात आले. हे धोरण १ एप्रिल २०१३ ते ३१ मार्च २०१८ पर्यंत लागू असणार आहे. या धोरणाचा मुख्य उद्देश 'महाराष्ट्राला जागतिक स्तरावर उत्पादनाचे इष्ट स्थळ बनवून गतिशिल शाश्वत गुंतवणूक करून समावेशक वाढ करणे आहे. या नवीन औद्योगिक धोरणात गडचिरोली, गोंदिया, चंद्रपूर, भंडारा, यवतमाळ, नांदेड या नक्षलग्रस्त जिल्हयांचा औद्योगिकरण न झालेल्या जिल्हयांचा विशेष समावेश करण्यात आला.महाराष्ट्रातील उद्योजकता विकासाकरीता प्रामुख्याने महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र व जिल्हा उद्योग केंद्र या दोन संस्था कार्यरत आहेत. या दोन संस्थांच्या माध्यमातून उद्योगाला दिशा देण्याचे महत्वाचे कार्य केल्या जाते.

**१) महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (MCED) :**

भारतात इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रामध्ये औद्योगिकरणाच्या प्रक्रियेचा फार लवकर प्रारंभ झाला. औद्योगिकरणाच्या दृष्टीकोणातून विचार केल्यास महाराष्ट्र प्रगत प्रदेश म्हणून सर्वमान्य आहे. महाराष्ट्रात औद्योगिकरणामुळे अनेक व्यावसायिक संधी निर्माण झाल्या. या संधीचा फायदा राजस्थान, गुजरात, पंजाब व दक्षिणेकडून आलेल्या व्यावसायिकांनी घेतला. एक काळ असा होता की उद्योगधंद्याच्या क्षेत्रात अशी समजूत होती की, उद्योजक हा जन्मावा लागतो. परंतू सातत्याने प्रयत्न करून व निरनिराळे प्रयोग करून आता असेही सिद्ध झाले आहे की, उद्योजक घडविता येतात. मात्र संबंधीत व्यक्तींना कामाची आवड व तळमळ असणे आवश्यक आहे. निवडलेल्या क्षेत्रात स्वतःला झोकून देण्याची त्याची तयारी असली पाहिजे.

उद्योगधंदा करू इच्छिणा-या तरूणांना हया दृष्टीकोणातून प्रवृत्त करण्यासाठी जिल्हा उद्योग केंद्रामार्फत उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात येते. इ. स. १९८८ पासून केवळ प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यासाठी उद्योजकता विकास केंद्राची कल्पना अस्तीत्वात आली व त्यानुसार औरंगाबाद येथील महाराष्ट्र औद्योगिक महामंडळाच्या जागेत 'महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राची' (डब्म्) स्थापना झाली. या केंद्राची सहा विभागीय स्तरावर उपकार्यालये असून प्रत्येक जिल्हयात संस्थेचा एक प्रेरक, प्रशिक्षक उद्योजकता विकास प्रशिक्षणाचे काम पाहतो. हया संस्थेतर्फे 'उद्योजक' हे मासिकही प्रकाशित होते.महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र या राज्यस्तरीय प्रशिक्षण संस्थेची स्थापना महाराष्ट्र शासनाच्या पुढाकाराने झाली आहे. सीकॉम, महावित्त, महाराष्ट्र लघू उद्योग विकास महामंडळ, महाराष्ट्र लघू उद्योग महामंडळ, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मेल्ट्रान या राज्य औद्योगिक महामंडळाच्या संयुक्त संस्था आहे. शास्त्रशुद्ध प्रशिक्षणाद्वारे उद्योजक घडविणे, उद्योजकतेला पोषक वातावरण निर्माण करणे, उद्योजकतेच्या सर्व अंगाविषयी माहिती उपलब्ध करून देणे व उद्योजकतेच्या क्षेत्रात संशोधन करणे ही हया संस्थेची प्रमुख उद्दिष्टे आहेत.

**२) जिल्हा उद्योग केंद्र (DIC) :**भारत सरकारच्या सन १९७७ च्या औद्योगिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी जिल्हा स्तरावर जिल्हा उद्योग केंद्र स्थापन करण्याचा उपक्रम भारत सरकारतर्फे राबविण्याचे निश्चित करण्यात आले. देशाच्या प्रत्येक जिल्हयात जिल्हा उद्योग केंद्र स्थापन करण्याचे ठरले. जिल्हा उद्योग केंद्र कार्यालयाची १ मे १९७८ पासुन स्थापना करण्यात आली. लघू उद्योग व कुटीर उद्योगाचा विकास ग्रामीण भागात करण्याचा मुख्य हेतु होता. शहरातून ग्रामीण भागात उद्योगाचे एका ठिकाणी जाळे तयार करणे व जिल्हयातून त्याचे सनियंत्रण होणे हे मुख्य उद्देश होते. त्यासाठी भारत सरकारने राज्य सरकारसाठी मार्गदर्शक तत्वे निर्गमित केलेली आहेत. जिल्हा उद्योग केंद्राचे प्रमुख काम उद्योजकांना शासनाची सर्व मदत व परवाने सुलभरित्या उपलब्ध करून देणे व ग्रामीण भागात उद्योगांना स्थापन होण्यासाठी प्रोत्साहन देणे इ. आहे. महाराष्ट्रात आतापर्यंत ३४ जिल्हा उद्योग केंद्र स्थापन झालेली आहेत व ती केंद्रे सुरू आहेत. भारतामध्ये १९९० पर्यंत ४२५ जिल्हा उद्योग केंद्राची स्थापना झाली होती.

**कार्ये** :उद्योगांच्या संदर्भात सरकारने आखलेल्या बहुतेक धोरणांची अंमलबजावणी जिल्हा उद्योग केंद्राच्या माध्यमातून केली जाते. त्याकरीता जिल्हा उद्योग केंद्रांना विविध कार्य करावी लागतात. काही महत्वाची कार्ये पुढीलप्रमाणे आहेत.

१. उद्योगांना आवश्यक असलेल्या संसाधनांच्या उपलब्धतेबाबतीत पाहणी करणे, विभिन्न उत्पादनाच्या बाबतीत पुर्वानुमान करणे, गरजेनुसार तांत्रिक अहवाल तयार करणे.
२. लघू उद्योग, अती लहान उद्योग तसेच ग्रामोद्योगांना आवश्यक असलेली यंत्रसामुग्री कुठे उपलब्ध होईल त्याबद्दल उद्योजकांना माहिती देणे.
३. उद्योजकांना कर्ज मिळवून देण्याकरीता सहाय्य करणे.
४. उद्योजकांना अभिप्रेरीत करणे, त्यांना प्रशिक्षित करणे.
५. वस्तूंचे विपणन करण्यासाठी त्यांना सहाय्य करणे.
६. उद्योजकांच्या अडचणींचे निराकरण करणे, त्यांना मार्गदर्शन करणे.

केंद्र सरकारने जिल्हा उद्योग केंद्राची योजना सर्व राज्यांमध्ये व जिल्हयांमध्ये प्रभावीपणे राबविता यावी याकरीता या योजनेचे कार्य पाच स्तरावर विभागण्यात आले आहे. अंमलबजावणीचे कार्य व्यवस्थितपणे करता यावे याकरिता सर्व राज्यांचे पाच विभाग केले आहेत. पश्चिम विभागामध्ये महाराष्ट्र, गोवा व गुजरात राज्यांचा अंतर्भाव हेतो. इतर सरकारी यंत्रणांप्रमाणे जिल्हा उद्योग केंद्राची स्वतंत्र संघटना व कार्यपद्धती आहे. जिल्हा उद्योग केंद्राचे संपूर्ण कार्य हे महाव्यवस्थापकाच्या नियंत्रणाखाली चालते. महाव्यवस्थापकाच्या खाली सात व्यवस्थापक कार्य करतात. लघू उद्योग क्षेत्राची उद्योजकता वाढविण्याच्या दृष्टीने जिल्हा उद्योग केंद्रांनी महाराष्ट्रात महत्वाची भूमिका पार पाडली आहे.

**महाराष्ट्रातील महिला उद्योजकांची स्थिती :**महिलांच्या सक्षमीकरणात महाराष्ट्र शासनाअंतर्गत महाराष्ट्र उद्योजकता विकास कार्यक्रमांतर्गत मोलाचे कार्य करीत आहे. तरीपण पुरूषांच्या तुलनेत महिला उद्योजकांचे प्रमाण कमी आहे. महाराष्ट्रातील महिला उद्योजकांचे प्रमाण किती आहे ? हे खालील तक्त्यावरून स्पष्ट होते.

**राज्यवार महिला व पुरूष उद्योजकांची संख्या (हजारामध्ये)**

| राज्य | उद्योग | | |
|---|---|---|---|
| | महिला | पुरूष | एकूण |
| तामीळनाडू | ५४.६५ | १७६.२३ | २३३.८८ |
| गुजरात | २३.४० | २०६.४३ | २२६.८३ |
| उत्तर प्रदेश | ८.३६ | १७६.३६ | १८७.७४ |
| केरळ | ३८.३० | १११.८६ | १५०.१६ |
| मध्यप्रदेश | १०.१८ | ६६.८२ | १०७.०० |
| महाराष्ट्र | ८.६८ | ७७.६१ | ८६.५६ |
| राजस्थान | ५.६६ | ४८.६० | ५४.८६ |

Source :- Economic and Social Commission for Asia and the Pacific Report 2013

वरील आकडेवारीवरून लक्षात येते की, देशात उद्योजकतेच्या क्षेत्रात महाराश्ट्र अग्रगण्य राज्य म्हणून परिचित आहे. महिला उद्योजकांचा विचार करता महाराष्ट्राचा देशात ५ वा क्रमांक लागतो. महाराष्ट्रातील महिला उद्योजकांची संख्या ८.६८ हजार व पुरूष उद्योजकांची संख्या ७७.६१ हजार एवढी आहे. पुरूष उद्योजकांच्या तुलनेत महाराष्ट्रामध्ये महिला उद्योजकांचे प्रमाण ६.६७ टक्के आहे.

**निष्कर्ष** महिला सक्षमीकरणासाठी महाराष्ट्र शासनातर्फे उद्योजकता विकासाकरीता अनेक योजना व कार्यक्रम राबविले जातात. अत्यंत तळमळीने धोरणे ठरविली जातात. मात्र त्याची अंमलबजावणी त्याच तळमळीने होत नाही. लाभार्थी गटापर्यंत योजनांचे फायदे पोहचत नाही. अजुनही महिला आपल्या हक्कासंबंधी जागरूक नाहीत. आहे त्यात समाधान मानण्याची प्रवृत्ती व कौशल्यपूर्ण व्यवस्थापनाचा अभाव यामुळे मराठी स्त्री उद्योजक प्रवृत्तीयूक्त बनलेली नाही. स्त्री-पुरूष भेदभावाविषयी असलेली समाजाची मानसिकता अजुनही बदलत नाही. म्हणूनच महाराष्ट्रात महिला उद्योजकांच्या विकासामध्ये वाढ झालेली नाही. त्यासाठी विविध स्वयंसेवी संस्था व शासन यांनी एकत्रितपणे मोठया प्रमाणात जाणिव जागृतीचे कार्यक्रम राबविले पाहिजेत. त्याशिवाय स्त्रीयांचा मोठया प्रमाणात विकास शक्य नाही.

**संदर्भ :**


१. जैन पी. सी., शर्मा एन. एल. : ''उद्यमिता के मूलाधार'', आर. बी. डी. पब्लिशर्स, जयपूर, २००६.
२. गुप्ता यु. सी., गुप्ता मिनाक्षी : ''महिलाए एवं एद्यमिता विकास कार्यक्रम'', अर्जुन पब्लिशिंग हाऊस, नई दिल्ली, २०१४.
३. रारावीकर, गोडबोले, बोर्जेस : ''डायमंड अर्थशास्त्र कोष'', डायमंड पब्लिकेशन्स्, पुणे, २०००.
४. देसले किरण : ''स्पर्धा परिक्षा अर्थशास्त्र - १'', दिपस्तंभ प्रकाशन, जळगाव, २०१४.